N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0226 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**01/06/2026 21:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 01/06/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/06/2026

**Time From (वेळेपासून):** 14:26 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 01/06/2026 **Time (वेळ):** 21:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 058

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 01/06/2026 21:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कोल्हापूर महानगरपालीकेच्या , प्राथमीक शिक्षण समिती विभागाच, कार्यालयात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप पो नि

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत ,प्रतिबधक विभाग, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत ,प्रतिबधक विभाग, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दगडु चंद्राप्पा कुंभार | | | 1. वाशी नाका, खामकर गुरूजी , कलनी 223/7 कोल्हापूर, लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 50 भारतीय चलनी नोटा | 25,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिंनाक - 01/06/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष लक्ष्मीपूरी जि.कोल्हापूर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिंनाक 01/06/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी 13.30 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, समक्ष हजर असले तक्रारदार विजयकुमार दिनकर माने, वय - 36 वर्षे, पद - सहायक शिक्षक, मु.पो. कोतोली (मानेवाडी), ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर मो.नं. 9405282765 यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यांच्या तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश आम्हास दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार माने यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, मी वरील प्रमाणे असुन माझी रत्नागिरी जिल्हा परिषद येथुन कोल्हापूर महानगरपालीका शिक्षण विभाग कोल्हापूर कार्यालयात आंतरजिल्हा बदली 18 फेबुृवारी 2026 रोजी झालेली आहे. सदर दिवशी मी बदलीने कोल्हापूर येथे हजर झालो आहे. बदलीचे पुर्वी कोल्हापूर महानगरपालीके कडुन आवश्यक असलेले नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत मी नोंव्हेबर 2025 मध्ये तेथील प्राथमीक शिक्षण समिती कार्यालयातील श्री डी सी कुंभार यांना भेटलो होतो. त्यावेळी कुंभार साहेब यांनी मला नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी 25 हजार रूपये व बदलीनंतर हजर झालेनंतर पदस्थापना देणेसाठी 25 हजार असे एकुण 50 हजार रूपयेची मागणी केलेली होती. त्यावेळी मला नाहरकत प्रमाणपत्र मिळणे गरजेचे होते त्यामुळे नाईलाजास्तव 10,000/- रूपये कुंभार साहेबांना दिले होते. मी आंतरजिल्हा बदलीने 18/02/2026 रोजी हजर झालो. त्यानंतर मला पदस्थापना मिळणेबाबत मी फेबुृवारी 2026 पासुन वारंवार कुंभार साहेबाना भेटत होतो. परंतु ते मला पदस्थापना देण्यासाठी काहीतरी कारण सांगुन टाळत होते. मी हजर झाले पासुन माझा पगार काढलेला नाही म्हणुन मी दिंनाक 20/05/2026 रोजी कुंभार साहेब यांना भेटलो. त्यावेळी त्यांना मी माझा थकीत पगार व पगाराचा फरक काढा अशी विंनती केली, त्यावेळी त्यांनी मला आपला मागील हिशोब राहीलेला आहे. एनओसी व पदस्थापना देण्यासाठी 50,000/- रूपये तुम्ही देणार होता त्यातील 10,000/- रूपये तुम्ही दिलेले आहेत. राहीलेले 40,000/- रूपये दया, त्यानंतर तुमचा थकीत पगार व पगाराचा फरक काढला जाईल असे सांगितले. त्यांना मी 40,000/- रूपये मध्ये काहीतरी कमी करा अशी विंनती केली असता त्यांनी नकार दिला व त्यावेळी तुमच्याकडे पैशाची व्यवस्था होईल तेंव्हा मला भेटा असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैशांची व्यवस्था झालेनंतर भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो. कोल्हापूर महानगरपालीकेकडील प्राथमीक शिक्षण समिती विभागातील डी.सी.कुंभार हे माझेकडे मागणी करीत असलेले 40,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी, म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. मी दिंनाक 01/06/2026 रोजी कुंभार साहेब यांची कोल्हापूर महानगरपालीका येथे त्यांचे कार्यालयात भेट घेणेस जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय करवीर, जि.कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार माने यांची

पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार माने यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. माने यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार माने व पंच नं.01 एकनाथ पाटील यांचेसह सर्वप्रथम कोल्हापूर महानगरपालीकेकडील प्राथमीक शिक्षण समिति विभागातील डी.सी.कुंभार हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ड।ैज्म्त् कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार माने व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार माने व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार माने यांनी आमचे सुचनेवरून त्यांचे मो.नं.9405282765 वरून कुंभार साहेब यांचे मो.नं. 9420891004 वरती 14.26 वाजता फोन करून ते त्यांना कोठे आहे व भेटण्यास येवु का असे विचारले असता त्यांनी कोल्हापूर महानगरपालीकेच्या कार्यालयात असुन भेटण्यास या असे म्हणाले. त्यांनतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 14.30 वाजता चालु करून, तो तक्रारदार माने यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, माने व पंच नं.1 एकनाथ पाटील यांना तक्रारदार यांची मोटार सायकल नं. एम.एच. 09 एफ एच 7578 वरून कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिति विभागाचे कार्यालयात डी.सी.कुंभार यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 महेश साळोखे असे ऑफीसमध्ये थांबुन राहीलो. तक्रारदार माने व पंच नं.1 एकनाथ पाटील असे काहीवेळाने अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 14.48 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 एकनाथ पाटील यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिति विभागाचे कार्यालयात डी.सी.कुंभार यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच पाटील यांनी ते तक्रारदार यांचेसोबत कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिति विभागाचे कार्यालयात गेले त्यावेळी तक्रारदार हे कुंभार साहेब यांना भेटले त्यावेळी तक्रारदार यांनी कुंभार यांना त्यांचे थकीत पगाराचे व पगाराच्या फरकाच्या अनुषंगाने बोलुन ' पहिले आपण दहा हजार दिलत..." असे म्हणाले. त्यावेळी कुुंभार 'आता हा पगार होणार की...' असे म्हणाले. त्यावेळी माने ' फरकाच पण बघा की, लागलच काय आसल तर करतो, आपले पन्नास ठरले होते दहा दिले होते, किती काय...' असे म्हणाले. त्यावेळी कुुंभार ' हेंच काय, आणि...' असे म्हणुन ' हेंना जरा बाहेर घालवा की, बर काय काय ठरल होत आपल साग जरा..' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार यांनी मला बाहेर जाण्यास सांगितले. त्यावेळी मी कुंभार साहेबांच्या केबीन बाहेर येवुन थांबलो. त्यावेळी कुंभार व माने हे बोलत असल्याचे व त्यांचे बोलने मला स्पष्ट ऐकु येत होते. त्यावेळी माने ' तुम्ही पंचवीस एन.ओ.सी ला, आणि पंचवीस पदस्थापनेला म्हणला होता...' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार ' होय त्यातल कायच केल नाही तुम्ही...' असे म्हणाले. त्यावेळी माने ' दहा दिल होत सुरवातीला...' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार ' होय' असे म्हणाले. त्यावेळी माने यांनी ' आता किती दयायचे काय...' असे विचारले. त्यावेळी कुंभार ' वरचे कमी करा ओ, दहा.. कमी करा...' असे म्हणाले. त्यावेळी माने व कुंभार यांचेत पैशाचे अनुषंगाने तडजोडीबाबत चर्चा झाली. त्यावेळी माने पंचवीस करू, ' किती वाजेपर्यत हाय तुम्ही, आता पैसे नाहीत माझेकडे, पण दाजी हितच हाईत त्यांच्याकडन पैसे घेवुन येतो, चार वाजेपर्यत आहात तुम्ही..असे विचारले. त्यावेळी कुंभार 'हाय की असे म्हणुन ' आगावपणा काय तरी करशिला म्हणल... ' असे म्हणाले. त्यावेळी माने नाही नाही तसल काय नाही, असे म्हणाले. त्यावेळी कुंभार ' ठिक हाय ' असे म्हणाले. त्यानंतर आम्ही परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार माने यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 एकनाथ पाटील यांनी सांगितलेप्रमाणेच हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार माने व कोल्हापूर महानगरपालीकेकडील प्राथमीक शिक्षण समिति विभागातील डी.सी.कुंभार यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार माने यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार माने व डी.सी.कुंभार यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांना आतंरजिल्हा बदलीबाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारीपुर्वी दहा हजार रूपये स्विकारल्याचे कबुल करून तक्रारदार माने यांचा थकीत पगार व पगाराचा फरक काढुन देण्यासाठी तक्रारदार माने यांचेकडे तडजोडीअंती 25,000/- रूपये मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिति विभागाचे कार्यालयात डी.सी.कुंभार यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार माने यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 50 चलनी नोटा असे 25,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार माने व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार माने व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अॅथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार माने , दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार माने यांना डी.सी.कुंभार यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे हातरूमाल तोडांवरून फिरवण्याचा आहे हा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.40 वाजता सुरू करून, तो तक्रारदार माने यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार माने व पंच नं. 1 एकनाथ पाटील असे त्यांचे मोटर सायकलने कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिती विभागाचे कार्यालयात डी.सी.कुंभार यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 महेश साळोखे असे आपआपले दुचाकी वाहनावरून तक्रारदार यांचे पाठोपाठ कोल्हापूर महानगरपालीकचे शिवाजी मार्केट इमारत येथे असले प्राथमीक शिक्षण समिती विभागाचे कार्यालय असले ठिकाणी आलो. सदर इमारतीत आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. काहीवेळाने तक्रारदार माने व त्यांचेसोबत एक इसम बोलत इमारतीमधुन बाहेर येत असल्याचे तसेच त्यांचे पाठीमागे पंच एकनाथ पाटील हे ही चालत जात होते. तक्रारदार हे ज्या इसमाशी बोलत होते यावरून हा इसम डी.सी.कुंभार असल्याची आमची खात्री झाली. माने व कुंभार चालत चालत पापाची तिकटी ते लुगडी ओळ जाणारे रोडवर आले. त्यानंतर ते रोडलगत एका दुकानाचे आडोशास गेले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार माने यांनी कुंभार यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 महेश साळोखे व स्टाफ तेथे गेलो त्यावेळी कुंभार यांनी आम्हाला पाहुन त्यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवलेली होती ती लाच रक्कम त्यांनी त्यांचे हाताने काढुन रोडलगत फेकुन दिली. त्यावेळी आम्ही कुंभार यांचे हात पकडुन ताब्यात घेतले. त्यावेळी आम्ही सदर लाच रक्कम लागलीच दोन्ही पंचाकरवी ताब्यात घेतली. तक्रारदार माने यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 16.58 वाजता बंद केला. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यावेळी कुभांर यांचे डावे हाताचे बोटाना व तळ हातास तसेच कुभांर यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवली होती त्या खिशात व खिंशाचे कडास अंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर सापळा ठिकाणचे व्हिडीओ शुटींग आमचे सुचनेवरून सापळा पथकातील अमंलदार यांनी केलेले आहे. सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे पंच नं.01 एकनाथ पाटील यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार कुंभार साहेब यांना त्यांचे कार्यालयात भेटले. त्यावेळी त्यांचेत देसाई सर यांच्याकडे पैसे देण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी माने 'आणलेत आता पंचवीस हजार दांजीच्याकडुन...' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार ' देसाईच्याकड दया की, देसाईच्याकड दया, बर चला खाली चला तिथ.. असे म्हणाले. त्यानंतर ते कार्यालयातुन बाहेर रोडवर आले. त्यावेळी त्यांचेत पगार व तक्रारदार यांचे वडीलांचे आजारपणाबाबत बोलेने झाले. त्यावेळी तक्रारदार माने ' ते दाजी जरा गेले होते बाहेर त्यामुळे थोडस...' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार ' दे ' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार माने यांनी त्यांच्याकडे कुंभार यांनी मागणी केलेप्रमाणे लाच रक्कम 25,000/- रूपये कुंभार यांचेकडे दिली. त्यावेळी कुंभार यांनी तक्रारदार यांचेकडुन 25,000/- डाव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे डावे बाजुचे पुढील खिशात ठेवली. त्यावेळी तक्रारदार माने यांनी ' हे पंचवीस हजार आहेत मोजुन घ्या मग..' असे म्हणाले. त्यावेळी कुंभार 'आसु दे..' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार माने यांनी कुंभार यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच एकनाथ पाटील यांचे हकीकतशी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कोल्हापूर कार्यालय येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार विजयकुमार दिनकर माने यांना आतंरजिल्हा बदलीबाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी कोल्हापूर महानगरपालीकेच्या प्राथमीक शिक्षण समिती विभागाचे कार्यालयात डी.सी.कुंभार यांनी तक्रारीपुर्वी दहा हजार रूपये स्विकारल्याचे कबुल करून त्यांनी तक्रारदार माने यांचा थकीत पगार व पगाराचा फरक काढुन देण्यासाठी तक्रारदार माने यांचेकडे स्वताःकरीता बेकायदेशीरपणे तडजोडीअंती 25,000/- रूपये लाचेची मागणी केली. तक्रारदार माने यांचेकडुन 25,000/- रूपये लाच रक्कम बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना डी.सी.कुंभार यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक दगडु चंद्राप्पा कुंभार, वय - 52 वर्षे, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर, रा.

वाशी नाका, खामकर गुरूजी कॉलनी 223/7 कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी फिंयाद आहे.
माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

shriram kalyanrao kanherkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

पोलीस ठाणे अंमलदार
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

**Registered by** (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shriram kalyanrao k
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):